# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२६

## (सकाळी ११-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ) तारांकित प्रश्न**

**(ब) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : "डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात कोट्यवधी रुपयांच्या खरेदी-विक्रीच्या नोंदी नसल्याबाबत" या विषयावरील श्री .प्रशांत बंब, वि.स.स. यांच्या दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ३८२८१ च्या अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**तीन : (शुक्रवार, दिनांक ०३ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री अमित साटम, रमेश बोरनारे, दिलीप वळसे-पाटील, योगेश सागर, अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, अतुल भातखळकर, अर्जुन खोतकर, चेतन तुपे, कालिदास कोळंबकर, दिपक केसरकर, ॲड. माणिकराव कोकाटे, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. तानाजी सावंत, श्री. अनिल पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री राजेंद्र गावित, धर्मरावबाबा आत्राम, संजय उपाध्याय, विजय शिवतारे, राजकुमार बडोले, मिहीर कोटेचा, राजेश क्षिरसागर, संजय बनसोडे, पराग शाह, प्रदिप जैस्वाल, सर्वश्रीमती सुलभा खोडके, विद्या ठाकूर, डॉ. बालाजी किणीकर, श्री. शेखर निकम, कॅ. आर. तमील सेल्वन, सर्वश्री विलास तरे, प्रताप पाटील-चिखलीकर, राम कदम, चंद्रदीप नरके, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री रविंद्र चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, दिलीप बनकर, संजय केळकर, मंगेश कुडाळकर, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री किसन कथोरे, किशोर पाटील, राजेश विटेकर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री शांताराम मोरे, सुनिल शेळके, प्रशांत ठाकूर, प्रकाश सुर्वे, चंद्रकांत नवघरे, महेश चौघुले, निलेश राणे, काशिनाथ दाते, नरेंद्र मेहता, तुकाराम काते, सचिन पाटील, महेश बालदी,**

**अशोक पाटील, मनोज कायंदे, कुमार आयलानी, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री राजन नाईक, बालाजी कल्याणकर, श्रीमती स्नेहा दुबे, श्री. सुहास कांदे, श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री संजय गायकवाड, हरिश्चंद्र भोये, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री रविशेठ पाटील, महेंद्र थोरवे, सिध्दार्थ शिरोळे, महेंद्र दळवी, प्रविण दटके, चंद्रकांत पाटील, मोहन मते, संतोष बांगर, सुनिल कांबळे, विश्वनाथ भोईर, महेश लांडगे, दिलीप लांडे, ॲड. राहूल कुल, सर्वश्री महेश शिंदे, शंकर जगताप, आमश्या पाडवी, हेमंत रासने, हिकमत उढाण, भिमराव तापकीर, बाबुराव कदम-कोहळीकर, डॉ. संजय कुटे, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री रणधीर सावरकर, मुरजी पटेल, सुमित वानखेडे, आनंद तिडके, सुधीर मुनगंटीवार, अमोल पाटील, विनोद अग्रवाल, सुहास बाबर, राजेश बकाने, विलास भुमरे, चरणसिंग ठाकूर, राजेश मोरे, विक्रम पाचपुते, विठ्ठल लंघे, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री किरण सामंत, बबनराव लोणीकर, राजेंद्र यड्रावकर-पाटील, प्रशांत बंब, शरददादा सोनावणे, अभिमन्यु पवार, डॉ.अशोकराव माने, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री सुरेश भोळे, सुरेश धस, अतुलबाबा भोसले, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, सर्वश्री अनुपभैय्या अग्रवाल, अमोल जावळे, सचिन कल्याण-शेट्टी, गोपिचंद पडळकर, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री किशोर जोरगेवार, रत्नाकर गुट्टे, शिवाजी पाटील, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री अक्षय कर्डिले, राघवेंद्र पाटील, सुभाष देशमुख, हरिष पिंपळे, विजय देशमुख, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, प्रताप अडसड, देवराव भोंगळे, राजेश पवार, श्रीमती नमिता मुंदडा, श्री. जितेश अंतापुरकर, श्रीमती अनुराधा चव्हाण, सर्वश्री रवी राणा, राणाजगजितसिंह पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री अमल महाडिक, समाधान आवताडे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"मुंबई, ठाणे व कल्याण महानगरपालिकांच्या निवडणूका होऊन महानगरपालिका सभागृहांची स्थापना झाल्यानंतर मागील काही महिन्यांमध्ये महानगरपालिकांच्या प्रशासनात पारदर्शकता व कार्यक्षमता राहण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण सुधारणा करण्यात येणे, मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत देण्यात येणाऱ्या २७ वस्तूंची खरेदी तसेच आरोग्य विभागाची खरेदी 'जेम' पोर्टलमार्फत करण्यात येणे, सुमारे १ हजार कोटींची अनावश्यक निविदा रद्द करण्यात येणे, गारगाई-पिंजाळ जल प्रकल्पाच्या खर्चामधून सुमारे २८० कोटींची बचत करण्यात येणे, महानगरपालिका रुग्णालयांमधील रुग्णसेवा व रुग्णस्थिती प्रणाली ऑनलाईन करण्यात येणे, शहरातील स्वच्छतेस प्रोत्साहन देण्यासाठी 'मुंबई क्लीन लीग' स्पर्धा सुरु करण्यात येणे, मुंबई शहरातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी बांधकाम व पाडकाम कचरा (C & D Waste) व्यवस्थापन धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणे, मुंबई (अंधेरीतील सबवेसह) विविध भागात पावसाळयात साचणाऱ्या पाण्यापासून संरक्षण देण्यासाठी आयआयटी, मुंबईच्या, सहकार्याने सर्वसमावेशक पूरनियंत्रण आराखडा तयार करुन केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणे, अंधेरी पूर्व येथे शासनाचे सुसज्ज रुग्णालय निर्माण करण्याची आवश्यकता, अंधेरी पूर्व येथील सुभाषनगर या झोपडपट्टीत पाणी पुरवठा करण्यासाठी डोंगरमाथ्यावर जलकुंभ बांधण्याची आवश्यकता, मुंबईतील पार्किंग समस्येच्या निराकरणासाठी २७ प्रशासकीय विभागांमध्ये भूमिगत पार्किंग

सुविधा करण्याकरिता अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येणे, १४ वर्षांच्या मुलींना मोफत एचपीव्ही लस देण्याची मोहिम सुरु करण्यात येणे, यावर्षी एल निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता, तसेच महानगराची लोकसंख्या आणि मिळणारे पाणी यामध्ये ६०० एमएलडीची तफावत असल्याने २०३०-३२ पर्यंत पाण्याची मोठया प्रमाणावर लागणारी आवश्यकता, या बाबी विचारात घेता दीर्घकालीन जलसुरक्षेसाठी पर्यायी जलस्त्रोतांचा शोध घेण्यात येणे, शहरातील नैसर्गिक तलाव, तळी व जलाशय याचे पुर्नरुज्जीवन करणे, तसेच प्रस्तावित डिसॅलिनेशन प्रकल्पाची क्षमता वाढविण्याची आवश्यकता, मुंबई शहरातील वाढत्या घनकचऱ्यांचे शास्त्रोक्त प्रक्रियेद्वारे व्यवस्थापन करुन 'वेस्ट टु एनर्जी' तत्वावर वीज निर्मिती प्रकल्पांना चालना देण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेतील जन्म व मृत्यू दाखल्याच्या नोंदीमध्ये सुमारे ८७ हजार प्रकरणात फेरफार झाल्याचे व १८ हजार प्रकरणांमध्ये अनियमितता आढळून आल्याचे निदर्शनास येणे, संबंधित दोषींवर कठोर कारवाईची आवश्यकता, मुंबईतील एअरपोर्ट फनल झोन मधील बाधित इमारती तसेच एसआरओ १५० जुहू मिलिटरी ट्रान्समिशन स्टेशन मधील पुनर्विकासाकरिता 'हौसिंग फॉर ऑल' पॉलिसीअंतर्गत संबंधितांना दिलासा देण्यासाठी नियम करणे, खुल्या सार्वजनिक जागांबाबतचे तसेच फेरीवाला क्षेत्राचे धोरण अंतिम करण्याची आवश्यकता, आयआयटी मुंबईच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या पूरनियंत्रण प्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, मुंबईतील जवळपास ५० टक्के लोकसंख्या झोपडपट्टीमध्ये असून तेथील स्वच्छता व्यवस्थापनासाठी राबविण्यात येणारी 'दत्तक वस्ती योजना' अपेक्षित परिणाम साधण्यात अपयशी ठरत असल्याने त्यात व्यापक सुधारणा करण्याची आवश्यकता, बीडीडी चाळी व धारावी पुनर्विकासाला चालना मिळणे, स्वयं पुनर्विकासाकरिता एक वेगळे प्राधिकरण नेमून त्याची अंमलबजावणी करण्यात येणे, पागडीच्या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून करण्यात आलेल्या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, वांद्रे ते वर्सोवा सीलिंकचे काम सुरु असून वर्सोवा ते भाईंदर या उत्तर दिशेच्या कोस्टल रोडचे काम सुरु असल्यामुळे मुंबई व एमएमआर विभागातील वाहतूकीच्या समस्येचे निवारण होत असणे, साधारणतः ५० टक्के मेट्रोचे काम पूर्ण झाले असून उर्वरित ५० टक्के काम जलदगतीने सुरु असणे, मुंबईची वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई शहरामध्ये सागरी मार्ग (वॉटरवेज ट्रान्सपोर्ट) सुरु करण्याकरिता स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना होणे, क्रांतीनगर ते गोरेगाव या १२० फुटांच्या डीपी रोडचे काम लवकरात लवकर सुरु करण्याची आवश्यकता, कांदळवन क्षेत्रांमध्ये सन २००० पूर्वीपासून वास्तव्यास असलेल्या झोपडपट्टीधारकांना शासनाच्या विद्यमान धोरणानुसार कोणतेही संरक्षण उपलब्ध नसणे, त्यामुळे सदर पात्र झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी विशेष धोरण निश्चित करुन तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असणे, तसेच मुंबई शहराचा सर्वांगीण विकास व मुंबई शहरातील घरकुल योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(१) सर्वश्री सुनिल प्रभू, राजू तोडसाम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"वसई-विरार पुर्वेकडील शिरगाव रायपाडा येथील जमिनीतील दगडखाणीत बेकायदा पध्दतीने स्फोट घडवून अवैध उत्खनन केल्याप्रकरणी महसूल विभागाकडे तक्रार करणारे सामाजिक कार्यकर्ते आत्माराम पाटील यांची दगडाने ठेचून निर्घुण हत्या केल्याची घटना दिनांक १२ मे, २०२६ रोजी घडणे, सदरहू प्रकरणात अवैध उत्खननाची प्रत्यक्ष ठिकाणी पाहणी करण्यास गेलेले महसूल विभागाचे मंडळ अधिकारी, प्रभाकर पाटील यांनाही खाण माफियांनी बेदम मारहाण करुन जखमी करण्यात येणे, अवैध उत्खननात केलेल्या बेकायदेशीर स्फोटामुळे या परिसरातील घरांना तडे जाऊन नुकसान झाल्यामुळेच सामाजिक कार्यकर्त्यांनी महसूल विभागाकडे तक्रार करण्यात येणे, शासकीय अधिकाऱ्यांना मारहाण करणे व हत्येच्या घटनेमुळे या परिसरातील जनतेत व महसूल अधिकाऱ्यांमध्ये निर्माण झालेले भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण, बेकायदा उत्खनन करुन शासनाच्या महसूलाचे नुकसान करणाऱ्या खाण माफियांविरुध्द कारवाई करण्याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र शासनाने सन १९७१ मध्ये मुंबई येथील बॅकबे ब्लॉक क्र.३ व बीबीआर ५ मधील काही भूखंड तसेच उपनगरातील जुन्या सहकारी संस्था ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्याने विकासकांना प्रदान करण्यात आलेले असणे, विकासकांनी सदर भूखंडांवर इमारती बांधून सदनिका/गाळे खुल्या बाजारभावाने खाजगी व्यक्तींना व संस्थांना विक्री करण्यात आलेले असणे, तद्नंतर सदर सदनिकाधारकांनी या इमारतींमध्ये सहकारी सोसायटीची स्थापना करण्यात आलेली असणे, परंतु शासनाच्यावतीने जिल्हाधिकारी यांनी करावयाचा भाडेकरारनामा केलेला नसल्यामुळे सदर सहकारी गृहनिर्माण संस्थाना अनर्जित उत्पन्नाच्या नोटीसा पाठविण्यात येणे, शासनाने दिनांक २२ जून, २००० रोजीच्या पत्राद्वारे या जागेवर असलेल्या सहकारी सोसायटी किंवा कॉर्पोरेट बॉडी यांचे नावे भाडेपट्टा निष्पादनासाठी परवानगी दिलेली असणे, परंतु स्टँप ड्युटी आजच्या दरानुसार भरावी लागत असल्याने भाडेपट्टा निष्पादनाची कार्यवाही दीर्घकाळ प्रलंबित असणे, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या भाडेपट्टा निष्पादनाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी स्टँप ड्युटीची आकारणी सध्याच्या रेडीरेकनर दरावर न करता संबंधित जमीन प्रदान करण्यात आली त्या वेळेस लागू असलेल्या मूल्य व दराच्या आधारे करण्यात यावी अशी मागणी होत असणे, परंतु स्टँप ड्युटीची आकारणी सध्याच्या रेडीरेकनर मूल्यावर होत असल्याने अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहिलेली असणे व यावर शासनाची कोणतीही भूमिका नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(३) श्री. मनोज घोरपडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"कराड उत्तर विधानसभा मतदार क्षेत्रातील तसेच कोरेगाव तालुक्यातील अनेक गावांमध्ये सिंचन व पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, कोरेगाव तालुक्यातील मौजे अपशिंगे, अंभेरी, बेलेवाडी, वेळू, पवारवाडी, पिंपरी, आर्वी व कोंबडवाडी या गावांना जिहे-कठापूर उपसा सिंचन योजनेमधून पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, या गावांमधील शेतकरी पावसावर अवलंबून असल्याने अनियमित पर्जन्यमान, दुष्काळसदृश परिस्थिती व वाढता उत्पादन खर्च यामुळे त्यांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागणे, तसेच मौजे कोरेगाव, टेंभू, सयापूर व कामथी या गावांना टेंभू उपसा सिंचन योजनेमधून पाणी मिळणे गरजेचे असून या भागातील शेती, पिण्याचे पाणी व ग्रामीण अर्थव्यवस्था यासाठी या योजनांचे पाणी अत्यंत महत्त्वाचे असणे, या गावांचा या योजनांमध्ये समावेश करून पाणीपुरवठा उपलब्ध झाल्यास हजारो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असणे, त्यामुळे कराड उत्तर विधानसभा मतदार क्षेत्रातील मौजे अपशिंगे, अंभेरी, बेलेवाडी, वेळू, पवारवाडी, पिंपरी, आर्वी, कोंबडवाडी ता.कोरेगाव जि.सातारा या गावांना जिहे कठापूर योजनेमधून पाणी उपलब्ध करून मिळावे, तसेच मौजे कोरेगाव, टेंभू, सयापूर, कामथी या गावांना टेंभू उपसासिंचन योजनेतून तातडीने पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(४) सर्वश्री शिवाजी पाटील, हारुन खान, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"कोल्हापूर  जिल्हयातील सहयाद्री व्याघ्र प्रकल्प आणि राधानगरी वन्यजीव अभयारण्याला जोडणा-या संवेदनशील “टायगर कॉरिडॉर” मुळे कोल्हापूर जिल्हयातील ३७७  गावे बाधित होणार असल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०२६ मध्ये उघडकीस येणे, यासंदर्भात दिनांक २१ मे पर्यंत कॉरीडॉरची अधिसूचना प्रसिध्द होणार असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये असलेले चिंतेचे वातावरण, कॉरीडॉरला मान्यता मिळाल्यास संबंधित गावांवर वन विभागाचे विविध निर्बंध लागू होण्याची असलेली शक्यता, सदर प्रकल्पामुळे स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर, शेती व्यवसायावर, घरबांधणीवर, विकास कामांवर तसेच मुलभूत सुविधांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येणे, प्रस्तावित कॉरीडॉरमुळे वन्यप्राण्यांच्या वाढत्या त्रासामुळे नागरीक अत्यंत त्रस्त असणे, हत्ती, बिबटे, गवे व इतर वन्यप्राण्यांकडून शेती पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होत असून अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडलेले असणे, सदर प्रकल्पाबाबत स्थानिक जनतेच्या भावना, शेतक-यांचे हित आणि ग्रामीण भागाच्या विकासाचा विचार करुन सहयाद्री व्याघ्र प्रकल्पासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या या संभाव्य कॉरीडॉरची मान्यता रद्द करण्याबाबत होत असलेली मागणी, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(५) सर्वश्री विजय रहांगडाले, विनोद अग्रवाल, संजय पुराम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"गोंदिया जिल्ह्यात तिरोडा तालुक्यामध्ये निमगाव व इंदोरा गावाजवळ स्थानिक नाल्यावर निमगाव लघु पाटबंधारे प्रकल्प स्थित असून या प्रकल्पामुळे ३.९१५ द.ल.घ.मी.पाणी साठा निर्मित होणार असून यामुळे १३ गावातील १०६२ हेक्टर जमिनीला पाणी मिळणार असणे, या प्रकल्पास दिनांक ९ जुलै, १९७३ ला २३.७० लक्षची प्रशासकीय मान्यता प्राप्त असणे, या प्रकल्पाचे घळभरणी काम वगळता दोन्ही तीरावरील मातीकाम रोजगार हमी योजनेअंतर्गत ८० टक्के काम, सांडवापूर्ण व आगमन निर्गमन नालीचे ४० टक्के काम पूर्ण झाले असणे, त्यामध्ये वनजमिनीच्या अडचणीमुळे उर्वरित काम सुरु करता आलेले नसणे, या प्रकल्पाकरिता १४१.६२ वन जमिनीच्या पर्यायी वनीकरण प्रस्तावास केंद्र शासनाने तत्वत: मान्यता दिली असून शासनातर्फे आतापर्यंत ४५ कोटी रुपये वनविभाग केंद्र शासनास भरणा केले असणे, केंद्र शासनाच्या दिनांक १ ऑक्टोबर, २०२४ च्या पत्रान्वये पर्यायी वनीकरणाकरिता २७९ हेक्टर प्रस्तावित जमिनीपैकी २ हेक्टर क्षेत्र अति घनदाट जंगल असून २२ हेक्टर दाट जंगल व उर्वरित भागामध्ये शेती व वनीकरण असल्याने निमगाव आंबेनाला येथील वनीकरणाकरिता योग्य जागा उपलब्ध होत नसून यावर वन विभागाने अद्याप पर्यायी वन वळतीकरणाकरिता जागा उपलब्ध न केल्यामुळे सदर निमगाव प्रकल्पाचे काम सुरु होऊ शकत नसणे, वन विभागाच्या दिरंगाईमुळे १३ गावातील १०६२ हेक्टर जमीन वंचित राहणार असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**पाच : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन ) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(क) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - महाराष्ट्र चिकित्सा आस्थापना (नोंदणी व विनियमन) विधेयक, २०२६**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. हारुन खान, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - महाराष्ट्र चिकित्सा आस्थापना (नोंदणी व विनियमन) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**सहा : (शुक्रवार, दिनांक ०३ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री सुनिल प्रभू, रोहित पवार, अमिन पटेल, दिलीप सोपल, संदिप क्षीरसागर, अस्लम शेख, अजय चौधरी, बापूसाहेब पठारे, अमित देशमुख, डॉ. राहूल पाटील, श्री. रोहित पाटील डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, उत्तमराव जानकर, अमित झनक, सुनील राऊत, नारायण पाटील, विकास ठाकरे, संजय पोतनीस, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, नितीन देशमुख, राजू खरे, संजय मेश्राम, वरुण सरदेसाई, श्रीमती ज्योती गायकवाड, सर्वश्री साजिद खान पठाण, अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, रामदास मसराम, महेश सावंत, अनिल मांगुळकर, प्रवीण स्वामी, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)** .

"राज्यातील विद्यमान सरकार जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर पूर्णपणे अपयशी ठरले असून विकासाचे दावे केले जात असताना प्रत्यक्षात सर्वसामान्य नागरिकांना रोजच्या जीवनात गंभीर अडचणींचा सामना करावा लागत असणे, राज्यात महावितरणचा कारभार पूर्णपणे कोलमडला असून ग्रामीण भागात कोणतीही पूर्वकल्पना न देता ८ ते १० तास अघोषित लोडशेडिंग केली जाणे, वाढीव आणि चुकीची वीज बिले देऊन सर्वसामान्यांची लूट सुरू असणे, ट्रान्सफॉर्मर (डीपी) जळाल्यास तो बदलून मिळण्यासाठी शेतकऱ्यांना महिनाभर ताटकळत राहावे लागणे, पूर्वसूचनेशिवाय आणि विश्वासात न घेता 'स्मार्ट मीटर' सक्तीने लावण्यात येणे, या स्मार्ट मीटरमुळे वीज बिल दुप्पट-तिप्पट येत असून, रिचार्ज संपताच वीज खंडित होत असणे, नियोजनाचा अभाव असलेल्या शहरीकरणामुळे महानगरे आणि नगरपालिका क्षेत्रांचे रूपांतर कचराकुंडीत झाले असणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये करोडो रुपयांचा होत असलेला गैरव्यवहार, बोरीवली नगर भूमापन ६४२ च्या ठिकाणी नगर भूमापन अधिकारी यांना हाताशी धरुन चुकीचा नकाशा तयार करणे आणि एफएसआय वाढवून विकासकास २०० कोटी रुपयांचा फायदा करुन देणे, दिडोंशी येथील पद्मावती नगर येथे सन २०१२ पासून विकासकाने पुनर्वसन न करता ८० घरमालकांना बेघर करणे, मिरा-भाईंदरमधील लोकप्रतिनिधींनी अधिकारांचा दुरुपयोग करुन अनधिकृत बांधकाम करणे, मुंबईसह प्रमुख शहरांमध्ये टीडीआर नियमावलीत बेकायदेशीर बदल करून ठराविक बिल्डरांना हजारो कोटींचा फायदा देण्यात येणे, धारावी पुनर्वसन प्रकल्पात स्थानिक रहिवासी, छोटे उद्योजक आणि कष्टकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे कारस्थान सुरू असून अपात्रतेच्या नावाखाली हजारो गोर-गरिबांना मुंबईबाहेर हाकलण्याचा प्रयत्न सुरु असणे, कुर्ला, मुलुंड आणि मुंबईतील इतर मोक्याच्या शासकीय जमिनी प्रकल्पांच्या नावाखाली विकासकांच्या ताब्यात दिल्या जात असणे, रस्त्यांच्या विकासाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च दाखवला जात असला, तरी प्रत्यक्षात रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आणि निष्कृष्ट दर्जाची झालेली असणे, मुंबई-गोवा महामार्गाच्या संपूर्ण चौपदरीकरणाचे काम पूर्णत्वास न गेल्याने कोकणातील पर्यटनावर झालेला परिणाम, मुंबई-गोवा महामार्गासह सागरी महामार्गाचे काम अपूर्ण असताना शासनाने मुंबई ते गोवा ग्रीनफिल्ड हायवेची घोषणा

करूनही गेल्या ३ वर्षात त्यावर कोणतीही कार्यवाही न होणे, मोक्याचे आणि कोट्यवधी रुपये किमतीचे शासकीय भूखंड कवडीमोलाने मर्जीतील संस्था आणि उद्योगपतींना बहाल करण्यात येणे, गरिबांच्या घरांसाठी आणि सार्वजनिक सुविधांसाठी राखीव असलेल्या जमिनींची खुली लूट सुरु असणे, राज्यात विशेषत: बीड आणि सांगली जिल्ह्यातील हिंदू देवस्थान इनाम व वक्फ जमिनींच्या प्रकरणात कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झालेला असणे, या घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी वारंवार लोकप्रतिनिधींकडून करण्यात येणे, मौजे चिंचपूर तालुका आष्टी, जिल्हा बीड येथील इनाम दर्गाह जमीन हस्तांतरण प्रकरण महसूल विभागाने जाणीवपूर्वक पुनर्निरीक्षणातून वगळले असणे, देवस्थान जमिनी घोटाळ्यांवर अद्याप पर्यंत न झालेली कारवाई, मीरा भाईंदर तसेच येऊर जिल्हा ठाणे येथील आदिवासी जमिनींचा गैरव्यवहार, तक्रार करून देखील अद्याप पर्यंत न झालेली कारवाई, सरकारची परवानगी न घेता आदिवासींच्या जमीनी हडप करणे, भिवंडी येथील भूमी वर्ल्ड या विकासकाने शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून शॉपिंग मॉल उभारणे, तक्रार करून देखील अद्याप पर्यंत न झालेली कारवाई, महाराष्ट्रात वारंवार उघडकीस येत असलेले विविध प्रकारचे जमीन घोटाळे त्या अनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही."

**सात : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक ०२ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ४)**

**(१) श्री. राजेश पवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"नांदेड शहरात वारंवार विद्युत पुरवठा खंडित होणे, याबाबत महावितरणकडून तांत्रिक कारण दिले जात असून यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यास महावितरण अपयशी ठरणे, पावसाळा किंवा वाऱ्याच्या वेळी वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी लाईन मेंटेनन्स व इन्फ्रास्ट्रक्चर मजबूत करण्यासाठी निधीची असलेली आवश्यकता, नांदेड शहरासाठी सर्व विभागांचा समन्वय साधून (महानगरपालिका, वाहतूक पोलीस, महावितरण) संयुक्त कृती आराखडा तयार करण्याची आवश्यकता, शहरातील नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी डिजिटल/ ऑनलाइन प्रणाली कार्यरत करुन त्या तक्रारींचे निवारणही वेळेत करण्याची आवश्यकता, शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर मूलभूत नागरी सुविधांच्या उभारणीसाठी शासनाने दीर्घकालीन योजना (Long term Master Plan) तयार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री. प्रशांत बंब, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"सध्या मुलींसाठी विवाहाचे किमान कायदेशीर वय १८ वर्षे आणि मुलांसाठी २१ वर्षे असणे, या वयात मोठ्या प्रमाणावर युवक युवती उच्च शिक्षण घेत असणे, कौशल्य विकासाच्या प्रक्रियेत असणे, किंवा आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झालेले नसणे, विवाह ही केवळ दोन व्यक्तींची वैयक्तिक निवड नसून ती आयुष्यभराची

सामाजिक आर्थिक कौटुंबिक आणि कायदेशीर जबाबदारी असणे,अलीकडच्या काळात राज्यात पालकांच्या संमतीशिवाय घरातून निघून जाऊन विवाह करण्याच्या घटनांमध्ये झालेली वाढ, अशा विवाहांपैकी अनेक विवाह हे भावनिक आवेग, अल्प जीवनानुभव, अपुरी आर्थिक क्षमता, अपूर्ण शिक्षण आणि वैवाहिक जीवनाविषयी पुरेशी समज नसणे, पालकांच्या विरोधामुळे बेपत्ता तक्रारी अपहरणाचे गुन्हे, धमक्या, मारहाण, हत्ये सदृश्य घटना आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, पळून जाऊन लग्न केल्यामुळे पालकांना सामाजिक अपमान, मानसिक धक्का, आर्थिक नुकसान होणे, मुलींचे लग्नाचे वय १८ व मुलांचे २१ वर्षे असावे. परंतू मुला मुलींना मर्जीने लग्न करायचे असल्यास व पालकांचा त्यांना विरोध असल्यास मुलीचे किमान विवाहाचे वय १८ वरून २१ वर्षे व मुलाचे किमान विवाहाचे वय २१ वरून २४ वर्षे करण्याबाबत कायदेशीर बंधने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया तसेच नागपूर हे धान उत्पादनासाठी प्रसिद्ध जिल्हे असून या भागातील लाखो शेतकरी प्रामुख्याने धान पिकावर अवलंबून असणे, या जिल्ह्यांच्या कृषी अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा म्हणून धान पीक ओळखले जाते, तथापि, गेल्या काही वर्षांत हवामानातील अनिश्चितता, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, रोगराई तसेच उत्पादन खर्चात सातत्याने होत असलेली वाढ यामुळे या भागातील शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडणे, दिनांक २५ मार्च २०२६ रोजी महाराष्ट्र विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मा. मुख्यमंत्री यांनी धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम देण्याबाबत राज्य शासन सकारात्मक असल्याचे सभागृहात स्पष्टपणे नमूद करणे, यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून लवकरच अधिकृत निर्णय जाहीर करण्यात येईल, असे आश्वासन देणे, मात्र, आजपर्यंत या संदर्भातील अंतिम निर्णय जाहीर झालेला नसल्याने धान उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र अस्वस्थता निर्माण होणे, धान पिकाच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांना बियाणे, खते, कीडनाशके, सिंचन, डिझेल, मजुरी, काढणी व मळणी यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागणे, उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना शेतकऱ्यांना मिळणारा हमीभाव हा प्रत्यक्ष खर्चाच्या तुलनेत अपुरा ठरत असणे, परिणामी अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले असून उत्पादन विक्रीनंतरही अपेक्षित आर्थिक परतावा मिळत नसणे, शासकीय खरेदी केंद्रांवरील विलंब, ऑनलाइन नोंदणीतील तांत्रिक अडचणी, ओलावा निकषांची कठोर अंमलबजावणी तसेच वेळेवर देयके न मिळाल्याने शेतकऱ्यांच्या हाल अपेष्टा अधिकच वाढलेल्या असणे, अनेक शेतकरी खाजगी व्यापाऱ्यांना कमी दराने धान विकण्यास बाध्य होणे, या पार्श्वभूमीवर चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया व नागपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी प्रति हेक्टर २०,००० रुपये प्रोत्साहनपर रक्कम देण्याची मागणी शासनाकडे सातत्याने केलेली असणे, सदर रक्कम मिळाल्यास शेतकऱ्यांना कर्जफेड, पुढील हंगामाची तयारी, शेतीसाठी आवश्यक निविष्ठांची खरेदी तसेच

कुटुंबाच्या मूलभूत गरजा भागविण्यास मोठा आधार मिळणे, सदर विषय सार्वजनिक दृष्टया अत्यंत महत्त्वाचा असून राज्यातील विशेषतः चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया व नागपूर जिल्ह्यातील लाखो धान उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताशी थेट संबंधित असल्यामुळे विधानसभेत दिलेल्या आश्वासनाची तातडीने पूर्तता करून धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर २०,००० रुपये प्रोत्साहनपर रक्कम जाहीर करावी व ती थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी अशी जनतेकडून व लोकप्रतिनिधींकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री. जयंत पाटील, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"सन २०१४-१५ मध्ये रु. ३१५ कोटींची उलाढाल व रु.५० कोटींचा नफा कमावणाऱ्या हाफकिन महामंडळाची उलाढाल गेल्या ६-७ वर्षांत घसरून केवळ रु.७८ कोटींवर आली असून, महामंडळाला रु.४० कोटींचा तोटा झाला असणे, नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांच्या २०२३-२४ च्या अहवालानुसार, तत्कालीन जबाबदार अधिकारी यांनी रु.२०० कोटींच्या पोलिओ टेंडरमध्ये घोटाळा करणे, रु.६१ कोटींचा कस्टम भुर्दंड बसवणे आणि केंद्र सरकारचा Venom व कोविड प्रकल्पांचा निधी परत पाठवून महामंडळाचे अतोनात नुकसान केल्याचे सिध्द होणे, महामंडळातील अंतर्गत गैरकारभारामुळे गेल्या ३ वर्षांत तब्बल २० ते २२ व्यवस्थापकीय संचालक (MD) बदलले गेले असणे, CAG' अहवालात दोषी सिद्ध झालेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कारवाई करण्याची आवश्यकता, महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदावर पूर्णवेळ आय.ए.एस. (IAS) अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची आवश्यकता, सध्या कच्च्या मालाअभावी उत्पादन ठप्प असल्याने, खेळते भांडवल (Working Capital) म्हणून शासनाने तातडीने विशेष आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ५ जुलै, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.